# तोट्यातील सहकारी संस्था व सरकार

सहकारी संस्थांपैकी बहुतांशी संस्था मोठ्या संख्येने नफ्यात असतात. फार कमी सहकारी संस्था या तोट्यात असतात. फायद्यात असणाऱ्या सहकारी संस्थांची सभासदांना उत्तम सेवा देण्याचा या राज्याचा इतिहास आहे. परंतु नफ्यात असणाऱ्या सहकारी संस्थांना शासन मात्र कुठल्याही प्रकारची प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष मदत करताना दिसत नाही. उलटपक्षी अशा संस्थांना नाडण्याचे व त्यांचेकडून विविध मार्गांनी पैसे कसे उकळायचे अशी सिस्टिम या राज्यात अस्तित्वात आहे. मग सर्वेक्षण असो / ऑडीट असो / उपविधि दुरूस्ती असो / स्थगिती किंवा एखादा प्रस्ताव मंजूरीची बाब असो, **हमखासपणे या नफ्यातल्या सहकारी संस्थांना राजरोसपणे मायबाप सरकारच्या या सिस्टीमचे खालपासून वरपर्यंत भरदिवसा दरोडा टाकण्याचे कामकाज अव्याहतपणे चालू असते.**

परंतु ज्या सहकारी संस्था वर्षानुवर्षे तोट्यात व संचीत तोट्यात आहेत व ज्यांचे ताळेबंद व नफा - तोटा पत्रके ही कागदोपत्री सर्वांची दिशाभुल करण्यासाठी बनविली असतात अशा साखर कारखान्यांना मात्र सरकार मदत करते. वर्षानुवर्षे करोडो रूपयांच्या रकमेत तोट्यात असणाऱ्या साखर कारखान्यांना केंद्र व राज्य सरकारे विविध मार्गांनी थेट आर्थिक मदत सर्वांची दिशाभूल करून करीत असतात. दुष्काळाच्या नावाखाली, ऊस उत्पादनाच्या नावाखाली, साखरेच्या भावाच्या नावाखाली, केंव्हा महागाईच्या नावाखाली या साखर कारखान्यांना जनतेचे पैसे सरकारच्या तिजोरीतून **शेतकऱ्यांच्या हिताचे नाव पुढे करून** दिले जातात. सरकारने दिलेल्या **करोडो रूपयांची पॅकेजेस मधील एकही नया पैसा शेतकऱ्यांच्या थेट हातात आतापर्यंत दिलेला नाही.** पॅकेजेस गरिबांच्या नावाने जाहीर करायचे, परंतु त्या पॅकेजस मधील रक्कम मात्र साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाच्या स्वाधिन करायची आणि या साखर कारखान्यांनी प्रतिवर्षी केलेल्या प्रचंड **भ्रष्टाचारामुळे विविध बँकांच्या झालेल्या थकीत कर्जाची रक्कम भरण्यासाठी या पैशांचा उपयोग केला जातो.** म्हणजेच कारखान्याची जमीन खरेदी करण्यापासून मशिनरी खरेदी करणे, विविध उत्पादनासाठी उदा. साखर उत्पादन, सहवीज निर्मिती, इथेनॉल निर्मिती इत्यादी उत्पादनासाठी करोडो रूपयांचे आकडे फुगवून अत्यंत चलाखीने ही लूटमार केली जाते. **१० टक्के स्वत:चा मार्जीन मनी उभा करून ९० टक्के रक्कम कर्जाऊ घ्यायची हे धोरण राज्यात सहकारी साखर कारखान्यांच्या कुठल्याही प्रकल्पासाठी आहे.** परंतु ही १० टक्के रक्कम सुध्दा त्या कारखान्यांची नसते ती रक्कम सुध्दा कागदोपत्री मॅनेज करून कंत्राटदारांकडून अगोदरच फुगवून घेऊन प्रोजेक्ट पुर्ण केला जातो. व त्याही १० टक्क्यांच्या व्यतिरिक्त भ्रष्टाचार हा केला जातो. पर्यायाने १०० रूपयांचा प्रोजेक्ट २५० रूपयांमध्ये दाखवून हा भ्रष्टाचार सहमतीने व संगणमताने केला जातो. आणि हे कटू **सत्य सरकारचे आय. ए. एस. अधिकारी, ऑडीटर, विरोधी पक्ष व सरकारी अधिकाऱ्यांना चांगलेच ज्ञात असते.** परंतु ह्याबाबत कोणीही पुढे येत नाही. कारण **कायदा बनवणारे, अंमलबजावणी करणारे व कायदा हातात घेणारे हे एकच असतात.** वास्तविक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार एखादी सहकारी संस्था सलग ३ वर्षे तोट्यात गेल्यानंतर त्या सहकारी संस्थेचे म्हणजेच साखर कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करून राज्य सरकारला कारवाई

करता आली असती. परंतु हे काम सरकारने केले नाही. त्याचे कारणही तसेच आहे की, सरकारमधले प्रतिनिधी व त्यांचे जवळचे लोक या साखर कारखानदारीत थेट गुंतलेले आहेत. परिणामी ज्या सहकारी संस्था या राज्यात चांगला कारभार करून दरवर्षी नफा कमवतात त्यांना एका बाजूने पिडायचे व नाडायचे काम सरकार करते. दुसऱ्या बाजूने **जे साखर कारखाने वर्षानुवर्षे किमान १८ ते ३० वर्ष तोट्यात किंवा संचीत तोट्यात असतात, ते कारखाने प्रशासक किंवा अवसायकाच्या ताब्यात गेले नाहीत. ही बाब या राज्याच्या २ लाख कोटी रूपयांच्या कर्जास जबाबदार आहे.** शिवाय महाराष्ट्र राज्य सरकार थकहमी घेण्यास आता रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाच्या दृष्टीने सक्षम राहिलेले नाही. **म्हणजेच सरकाची भुमिका ही एका कायद्यान्वये दोन संस्थांना वेगळी असणे हे आता राज्यातील जनतेच्या हिताचे राहिलेले नाही,** हे आता स्पष्ट झालेले आहे. म्हणून संबंधित व्यवस्थेच्या प्रमुखांनी मा. उच्च न्यायालयात साखर कारखान्यांच्या बाबतीत खटले घातले पाहिजेत व ते खटले चालवून वर्षानुवर्षे तोट्यात चाललेल्या कारखान्यांवर प्रशासक नेमणे आवश्यक आहे. त्याशिवाय चांगले काम करणाऱ्या सहकारी संस्थांना न्याय मिळणार नाही, असा सर्वसामान्य सहकारी कार्यकर्त्यांची भूमिका आहे. आणि एक दिवस आम्ही यशस्वी होवूच.

**जय हिंद! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**